लोकमत epaper.lokmat.com सिंधुदुर्ग, मंगळवार, दि. १० जानेवारी २०२३

विवेकानंद नाईक : दोडामार्गमध्ये पत्रकार दिन साजरा

# बाळशास्त्रींचे विचार आत्मसात करून वावरणे काळाची गरज

लोकमत न्यूज नेटवर्क

**दोडामार्ग :** समाजासाठी संपूर्ण आयुष्य वाहून दिले, अशा महनीय व्यक्तींच्या नावाने विशेष दिन साजरे केले जातात. आद्यपत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी समाजहितासाठी मोठे योगदान दिले आहे. ६ जानेवारी त्यांच्या जयंतीनिमित्त पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. बाळशास्त्रींचे विचार आत्मसात करून समाजात वावरल्यास समाजाचा विकास होण्यास नक्कीच मदत होईल, असे मत विवेकानंद नाईक यांनी व्यक्त केले.



आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस विवेकानंद नाईक यांनी पुष्पहार अर्पण केला. यावेळी प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, डॉ. प्रज्ञाकुमार गाथाडे व दोडामार्ग तालुक्यातील सर्व पत्रकार बांधव उपस्थित होते.

दोडामार्ग येथील हळबे महाविद्यालयात तालुका पत्रकार समितीच्या वतीने पत्रकार दिन साजरा करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. आद्यपत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. व्यासपीठावर सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक विवेकानंद नाईक, प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष सुहास देसाई, सचिव महेश लोंढे, संदीप देसाई, संदेश देसाई, तेजस देसाई, गणपत डांगी, रत्नदीप गवस, ओम देसाई, समीर ठाकूर, शंकर जाधव तसेच शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. यावेळी सर्व पत्रकारांना शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. व्यासपीठावरील मान्यवरांनी मनोगते व्यक्त केली. पत्रकारांना शुभेच्छा देण्यात आल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक डॉ. प्रज्ञाकुमार गाथाडे, तर आभार प्रा. डॉ. संजय खडपकर यांनी मानले. तसेच पत्रकार संघाच्यावतीने गणपत डांगी यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य व इतर प्राध्यापकांचे आभार मानले.